# प्रेसनोट

दि.०८.१२.२०१९

<u>शिर्षक</u> :- चालक श्री. विजय भगवान घुगरे, वय ३४ वर्षे, पोलीस नाईक, ब.नं ५०५, नेम. तासगांव पोलीस ठाणे, संलग्न- चालक उपविभागीय पोलीस अधिकारी तासगांव विभाग यांना ४,५००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | पुणे परिक्षेत्र, सांगली युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | भिलवडी पोलीस स्टेशन, गुरनं १३९/२०१९ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८(सुधारीत २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | विजय भगवान घुगरे, वय ३४ वर्षे, पोलीस नाईक, ब.नं ५०५, नेम. तासगांव पोलीस ठाणे, संलग्न- चालक उपविभागीय पोलीस अधिकारी तासगांव विभाग |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४,५००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४,५००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी निशीदी कॉर्नर, माळवाडी, ता. पलुस, जि.सांगली या ठिकाणी कॉम्प्युटरवर ऑनलाईन पध्दतीने पैसे लावुन हार जितीचा खेळ हा व्यवसाय सुरु केला होता. सदर व्यवसायामध्ये तक्रारदार यांना सहकार्य करुन तक्रारदार याचेवर कारवाई न करण्याकरता डि.वाय.एस.पी कार्यालय तासगांव येथीत चालक पोलीस नाईक श्री. विजय घुगरे यांनी तक्रारदार यांचेकडे ५०००/- रुपये लाचेची मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी दि. ०६.१२.१९ रोजी इकडील कार्यालयात तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांनी दिले तक्रारीनुसार दि.०७.१२.२०१९ रोजी केले पडताळणीमध्ये लोकसेवक पोलीस श्री. घुगरे यांनी तक्रारदार यांचेकडे प्रथम ५,०००/- रुपये लाच मागणी करुन चर्चेअंती ४५००/- रुपये लाचेची मागणी करुन लागलीच रक्कम रत्नाकर बँक भिलवडी समोर घेवुन येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.<br>त्यानंतर लागलीच भिलवडी येथील रत्नाकर बँकेचे समोर सापळा लावला असता विजय भगवान घुगरे, वय ३४ वर्षे, पोलीस नाईक, ब.नं ५०५, नेम. तासगांव पोलीस ठाणे, संलग्न- चालक उपविभागीय पोलीस अधिकारी तासगांव विभाग यांनी तक्रारदार यांचेकडे ४,५००/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची लाचेची रक्कम स्विकारले असता रंगेहात पकडण्यात आले असुन त्यांचे विरुध्द भिलवडी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबेंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.शी संपर्क करावा.


संपर्क पत्ता :- पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, बदाम चौक, सांगली ,४१६४१६

संकेत स्थळ :- **acbmaharashtra.gov.in**

ई-मेल :- **acbwebmail@mahapolice.gov.in**

ऑनलाईन तक्रार ॲप :- **acbmaharashtra.net**

दुरध्वनी क्रमांक :- ०२३३,२३७३०९५ टोल फ्री क्रमांक :- १०६४

व्हॉट्सॲप क्रमांक :- ९९२३६१८००१